२२७

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नाशिक शहर **P.S.(ठाणे):** मुंबई नाका पोलीस स्टेशन

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0453 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/12/2025 11:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 09/12/2025
   **Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिनांक पर्यंत):** 09/12/2025
   **Time From (वेळेपासून):** 21:30 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 21:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 10/12/2025 **Time (वेळ):** 10:49 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामच्या संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 014

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/12/2025 10:49 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सोपान हास्पीटल समोरील रोडलगत ,वेदांत हास्पीटल शेजारील , बाजुकडील मोकळ्या प्लाटच्या ,भिंतीलगत नाशिक

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रुपाली रामू खांडवी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,सरकार वाडा,नाशिक शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,सरकार वाडा,नाशिक शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8379961020

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजय भिकाजी धनगर | | | 1. घर नं 1182,मेनरोड, ठाकरेरोड,केपी मार्केट समोर, नाशिक,मुंबई नाका पोलीस स्टेशन,नाशिक शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रु दराच्या 500 चलनी नोटा असे एकुण 2,50,000/ रुपये रोख | 250,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीसं गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

250,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

गुन्हा रजि.नं 453/2025 भ्रष्टचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे
फिर्यादीः-रुपाली रामू खांडवी, वय- 39 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक.
आरोपीः- संजय भिकाजी धनगर, वय- 51 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद महसुल नायब तहसिलदार सिन्नर,वर्ग 2, ता. सिन्नर जि.नाशिक रा. घर नं. 1182, मेनरोड, ठाकरेरोड, के.पी. मार्केट समोर, नाशिक
गुन्हा घडला तारिख, वेळ व ठिकाणः- दि. 09.12.2025 रोजी 21.30 वाजता सोपान हॉस्पीटल समोरील रोडलगत वेदांत हॉस्पीटल शेजारील पुर्व बाजुकडील मोकळया प्लॉटच्या भिंतीलगत
लाचेची रक्कम -500रु दराच्या 500 चलनी नोटा असे एकुण 2,50,000/- रुपये रोख
गुन्ह्याची थोडक्यात हकिगत – दि. 06.12.2025 रोजी 19.42वा. ते 20.45वा. चे दरम्यान संदिप हॉटेलच्या समोर रुद्राय अमृततुल्य हॉटेलमध्ये मुंबईनाका , नाशिक येथे लोकसेवक संजय भिकाजी धनगर, वय- 51 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद महसुल नायब तहसिलदार सिन्नर,वर्ग 2, ता.सिन्नर जि.नाशिक रा. घर नं. 1182, मेनरोड, ठाकरेरोड, के.पी. मार्केट समोर, नाशिक यांनी तक्रारदार यांचा मुलगा व सुनेच्या नावे मौजे दोडी खुर्द ता.सिन्नर, जि. नाशिक येथील ग.नं. 499, क्षेत्र 3 हे 60 आर शेत जमिन खरेदी केली असून, सदर खरेदी खतावरुन तलाठी दोडी खुर्द यांनी घेतलेल्या फेरफार नोंद क्र. 3345 हि रद्द होण्याकरीता घेतलेल्या तक्रारीचा निकाल तक्रारदार यांच्या मुलाच्या व सुनेच्या बाजुने लावुन देवुन, त्यांचेकडे सुनावणीकामी असलेली फेरफार नोंद क्र. 3345 ही मंजुर करुन देण्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांच्याकडे 10 लाखाची मागणी करुन तडजोडीअंती 2,50,000/- रुपये कागदावर लिहुन पंचासमक्ष लाचेची मागणी केली. व मागणी केलेली लाच रक्कम दि. 09.12.2025 रोजी 21.30 वाजता सोपान हॉस्पीटल समोरील रोडलगत वेदांत हॉस्पीटल शेजारील पुर्व बाजुकडील मोकळया प्लॉटच्या भिंतीलगत स्वतःचा आर्थिक लाभ करुन घेण्यासाठी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाने करुन घेण्यासाठी 2,50,000/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली म्हणुन माझी त्यांचेविरुध्द भ्रष्टचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे फिर्याद वगैरे मजकुराची फिर्यादि यांनी फिर्याद दिल्याने गुन्हा रजि दाखल करुन गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल अधिकार असणारे मॅजि. सो यांना सादर करुन गुन्ह्याचा पुढिल तपास करणेकामी वरिष्ठांच्या आदेशाने पोलीस उपअधिक्षक स्वाती पवार यांना आदेश दिला बाबत नोंद.
दाखल करणारे - सपोउनि टेमगर

फिर्याद मंबई नाका पो.स्टे.नाशिक.

दिनांक-10.12.2025.

मी रुपाली रामू खांडवी, वय- 39 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक.
सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे पाच महिन्यापासून कार्यरत आहे.
आम्ही दि.06.12.2025 रोजी दैनंदिन कर्तव्यावर हजर असताना मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक यांनी आम्हास कार्यालयात उपस्थित झालेले तक्रारदार रावसाहेब सखाराम कांगणे यांची तक्रार नोंदवुन पुढील कार्यवाही

मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक शहर

करण्याचे आम्हास निर्देश दिले होते. आम्ही तक्रारदार यांना विचारपुस करता त्यांनी लोकसेवकाविरुध्द लाच मागणीची तक्रार असल्याचे सांगितल्याने आम्ही मा. विभागीय अधिकारी, सातपुर विभागीय कार्या., नाशिक महानगर पालिका, नाशिक यांना पत्र देवुन त्यांचे कडील श्री. प्रेम बाळु काळे, कनिष्ठ लिपिक, बिभागीय कार्यालय, सातपुर, महानगर पालिका, नाशिक व श्री. विलास अर्जुन काळे, सफाई कामगार, जाहिरात परवाने विभाग, विभागीय कार्यालय, सातपुर महानगर पालिका, नाशिक यांना शासकीय पंच म्हणून उपलब्ध करुन घेतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पंचांची व स्टाफची ओळख करुन देवुन, तक्रारदार यांना त्यांच्या तक्रारीची तोंडी हकिगत कथन करण्यास सांगितली त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची लेखी तक्रार दिली ती पंचांना वाचण्यास दिली. तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रारीसोबत हजर केलेल्या कागदपत्रांवर आम्ही व पंचांनी सह्या केल्या आहेत. तक्रारदार यांनी दिलेली तक्रार पुढीलप्रमाणे,

''रावसाहेब सखाराम कांगणे, वय-49 वर्षे, व्यवसाय- शेती, रा.दोडी शेतवस्तीवर, ता.सिन्नर, जि.नाशिक, मो.न. 9172137907.

समक्ष हजर राहून तक्रार देतो की, माझा मुलगा पृथ्वीराज रावसाहेब कांगणे व सुन सौ.ज्ञानेश्वरी रुपेश कांगणे यांच्या नावे मौजे दोडी खुर्द, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील ग.नं.499 क्षेत्र 3 हे 60 आर शेत जमिन श्री. शैलेंद्र खंडेराव नागरे, सर्वेष शैलेंद्र नागरे व कृपाली शैलेंद्र नागरे यांच्याकडुन 45,00,000/- रुपयास जमीन खरेदी केली असुन सदर खरेदी खतावरुन तलाठी दोडी खुर्द यांनी फेराफार नोंद क्र. 3345 घेतली आहे.

सदरची नोंद मंजुरीकरीता मंडळ अधिकारी नांदुर शिंगोटे यांच्याकडे प्रलंबित असतांना सदर नोंद मंजुरी सहरकत घेवुन श्री. राजेंद्र खंडेराव नागरे, निश्चल खंडेराव नागरे व इतर यांनी सदरची नोंद रद्द होणेकरीता तक्रारी अर्ज दिला. त्याबाबत मंडळ अधिकारी यांच्याकडे सुनावणी सुरु असतांना श्री. राजेंद्र नागरे यांनी मंडळ अधिकारी यांच्या कामकाजावर आक्षेप घेवुन प्रांत अधिकारी निफाड यांच्याकडे तक्रार अर्ज केला असता, प्रांत अधिकारी निफाड यांनी सदरचे प्रकरण महसुल नायब तहसिलदार श्री. संजय धनगर यांच्याकडे वर्ग केले. श्री संजय धनगर नायब तहसिलदार सदर प्रकरणावर सुनावणी सुरु केल्यावर मी दि.1.12.2025 रोजी सुनावणी करीता हजर असताना, सुनावणी झाल्यानंतर नायब तहसिलदार धनगर यांनी मला त्यांच्या कार्यालयात बोलावुन, ''तुमच्या प्रकरणात दि. 08.12.2025 ही तारीख दिलेली आहे. मी तुमच्या बाजुने निकाल देतो.त्या मोबदल्यात मला 10 लाख रुपये द्यावे लागतील नाही तर मी तुमची खरेदीखताची नोंद रद्द करुन टाकेल. 08 तारखेच्या आत शनिवारी सुटीच्या दिवशी नाशिकला येवुन मला भेटुन पैशांचे फायनल करा'' असे सांगितले. तेव्हा मी त्यांना विचार करुन भेटण्यास येतो असे सांगुन तेथुन निघून आलो आहे.

मला नायब तहसिलदार श्री. संजय धनगर यांना त्यांच्या मागणी प्रमाणे लाच देण्याची मनापासून इच्छा नाही तसेच त्यांचा व माझा कोणताही प्रकारचा वादविवाद, पुर्ववैमनस्य नसुन त्यांच्याशी माझा आर्थिक उसनवारीचा व्यवहार नाही.

त्यांनी मला बोलविल्याप्रमाणे मी त्यांना आज दि.06.12.2025 रोजी फोन करुन त्यांना माझ्या कामासंदर्भात बोलणी करण्यासाठी भेटण्याकरीता जाणार आहे. तेव्हा त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर आपले विभागामार्फत कार्यवाही होणेस विनंती आहे वगैरे मजकुरांची तक्रार, तक्रारदार यांनी नोंदविली आहे. तक्रारदार यांनी त्यांची तक्रारीची तोंडी हकीगत कथन केल्यानंतर त्यांनी त्यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली.

त्यानंतर,आम्ही तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचा निर्णय घेवून तक्रारदार यांना पंच 01 प्रेम काळे यांचे सोबत नायब तहसिलदार धनगर यांची भेट घेण्यासाठी फोन करुन पाठविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरुन नायब तहसिलदार धनगर यांना फोन लावून कोठे येवू बाबत विचारणा केली असता, त्यांचे मुंबईनाका येथील संदिप हॉटेलजवळ भेटण्याचे ठरले. तेव्हा आम्ही, तक्रारदार यांचेकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन सुरु करुन देवून पंच नं. 01 प्रेम काळे यांचेसह तक्रारदार यांचे कारने मुंबई नाका येथे संदिप हॉटेल येथे नायब तहसिलदार धनगर यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. काही वेळानंतर तक्रारदार व पंच नं.1 प्रेम काळे हे आमचेजवळ परत आले. तेव्हा आम्ही पंच नं. 01 प्रेम काळे यांना रवाना केल्यापासुन परत येण्यापावेतोची हकिगत विचारली असता तेव्हा त्यांनी '' तेथे तक्रारदार, पंच नं. 01 प्रेम काळे यांची नायब तहसिलदार संजय धनगर यांचेशी संदिप हॉटेलच्या समोरील रुद्राय अमृततुल्य चहाच्या दुकानावर भेट झाली. तेव्हा तक्रारदार व नायब तहसिलदार धनगर यांच्यात तक्रारदार यांच्या प्रलंबित कामाबाबत चर्चा झाली. त्यादरम्यान नायब तहसिलदार धनगर यांनी चहाच्या दुकानदारांकडून पेन व कागद मागवून कागदावर 10 लाख लिहुन तक्रारदार यांना दाखवले तक्रारदार यांनी त्यांना कागदावर लिहलेल्या पैशांबाबत पैसे जास्त होतात असे सांगितले. तेव्हा नायब तहसिलदार धनगर यांनी पैशांचा काही संबंध नाही असे तक्रारदार यांना बोलुन 'पैशांबाबत तोंडाने काही बोलु नका.' असे कागदावर लिहुन दाखविले. धनगर यांना तक्रारदार यांच्याबाबत संशय असल्याने

त्यांनी तोंडाने नकारात्मक बोलुन कागदावर लिहुन तक्रारदार यांच्याकडे 10 लाख त्यानंतर तडजोडी करतानां 5 लाख, 4 लाख, 3 लाख, अडीच लाख अशी कागदावर लिहुन पंचासमक्ष तडजोडीअंती कागदावर लिहुनच अडीच लाखाची लाचेची मागणी केली. सदर लाचेची रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. दि. 06.12.2025 रोजी झालेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर दि. 08.12.2025 रोजी तक्रारदार यांचे खरेदी खाताची फेरफार नोंद सुणावणी असल्याने ते तहसिल कार्यालय, सिन्नर येथे नायब तहसिलदार धनगर यांचेसमक्ष हजर राहिले असता, तेव्हा नायब तहसिलदार धनगर यांनी ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम घेवून येण्याचे सांगिल्याचे तक्रारदार यांनी आम्हांस सांगितल्याने आम्ही तक्रारदार यांच्याशी चर्चा करुन आज दि. 09.12.2025 रोजी सापळा कारवाईचे आयोजन करुन, दोन्ही पंच व सापळा पथक असे शासकीय वाहनाने ला.प्र.वि.नाशिक कार्यालयातुन रवाना होवून सिन्नर येथे एस.टी.स्टॅन्ड जवळ पोहचलो. तेथे सुरक्षित ठिकाणी तक्रारदार यांची भेट घेवुन तकारदार यांचेशी चर्चा करुन आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी सापळा कारवाईकामी 2,50,000/-रु हजर केले. आमच्या सुचनेवरुन पो.कॉ. प्रमोद पाळदे यांनी तक्रारदार यांच्याकडून सापळा कारवाईकामी घेतलेल्या 2,50,000/-रु लाचेच्या रक्कमेस अँथ्रासिन पावडर लावण्याचे प्रात्यक्षिक तक्रारदार व पंचाना करुन दाखवून सदर लाचेची रक्कम तक्रारदार यांच्याजवळील पिवळ्या रंगाच्या पिशवीत ठेवून दिली.

तेव्हा आम्ही तक्रारदार व पंचाना सापळा कारवाई बाबत सुचना दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोहवा वणवे यांनी त्यांच्याकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवून तक्रारदार व पंच नं. 01 प्रेम काळे यांना नायब तहसिलदार धनगर यांची भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालय, सिन्नर येथे तक्रारदार यांच्या कारने रवाना करुन त्यांच्या पाठोपाठ आम्ही, पंच नं. 02 विलास काळे व सापळा पथक असे शासकीय वाहनाने रवाना होवून तहसिल कार्यालयाच्या आवारात सापळा लावला. त्यानंतर तक्रारदार व पंच 01 हे तहसिल कार्यालयातुन बाहेर येवून त्यानंतर तक्रारदार यांच्या कारने बाहेर गेले. तेव्हा आम्ही त्यांच्या शासकीय वाहनाने त्यांच्या पाठोपाठ जावून त्यांचे कारच्या पुढे थांबुन तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केले. तेव्हा तकारदार व पंच नं. 01 यांनी नायब तहसिलदार धनगर यांनी तक्रारदार यांचेशी कामाबाबत चर्चा करुन त्यांना नाशिक येथे भेटु असल्याचे सांगितले. तेव्हा आम्ही सापळा कारवाई तुर्तास स्थगित करुन नाशिक येथे जाण्याचा सर्वानुमते निर्णय घेतला.

तेव्हा तक्रारदार पंच नं. 01 प्रेम काळे हे तक्रारदारांच्या कारने व आम्ही, सापळा पथक, पंच क्रं. 02 षासकीय वाहनाने नाशिक येथे जावून संदिप हॉटेल जवळ थांबलो. त्यानंतर काहीवेळाने आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरुन नायब तहसिलदार धनगर यांना फोन करुन ते नाशिक येथे आले असून भेटण्याबाबत विचारणा केली. तेव्हा धनगर यांनी ते देवीचे दर्शन घेवून येतो थोडा वेळ थांबा असे सांगितले. तेव्हा आम्ही सर्वजण सोपान हॉस्पिटलजवळ पोहचलो. आम्ही संपुर्ण सापळा पथक तक्रारदार यांचे सह गोलक्लब जवळ जावून थांबलो. तेथे थांबुन असताना नायब तहसिलदार धनगर यांचा तक्रारदार यांचा फोन येवून त्यांनी तेव्हा तक्रारदार यांनी धनगर यांना ते सोपान हॉस्पिटल जवळ पोहचत असल्याचे सांगितले. तेव्हा आमचे सुचनेवरुन पोहवा वणवे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्ड सुरु करुन देवून तक्रारदार व पंच 01 प्रेम काळे यांना तक्रारदार यांचे कारसह सोपान हॉस्पिटल जवळ थांबून राहण्यास सांगितले. व आम्ही त्यांचे आजुबाजुस सापळा लावला. काहीवेळाने तक्रारदार यांनी ठरवून दिलेला इशारा केला. तेव्हा आम्ही पंच नं. 02 विलास काळे व सापळा पथक असे त्यांचे जवळ पोहचलो. तेव्हा आम्ही पंच नं. 01 प्रेम काळे यांना विचारणा केली असता, त्यांनी समोरच दुचाकीजवळ उभे असलेल्या इसमाकडे इशारा करुन हे नायब तहसिलदार धनगर असून त्यांनी तक्रारदार यांचेशी कामाबाबत चर्चा करुन त्यांच्या ताब्यातील ज्युपीटर दुचाकीची त्यांनी चावीने डिक्की उघडुन तिचेमध्ये ठेवण्यास सांगुन ती त्यांनी स्वतः स्विकारुन डिक्कीमध्ये ठेवली. त्यानंतर त्यांना चर्चेदरम्यान नायब तहसिलदार यांना तक्रारदार यांचेबाबत संशय असल्याने त्यांनी तक्रारदार यांचेशी लाचेबाबत नकारात्मक बोलणे केले.

तेव्हा आम्ही पो.कॉ. प्रमोद पाळदे यांना नायब तहसिलदार यांना त्यांचे दोन्ही हात मनगटापासुन धरुन अटकावून ठेवण्यास सांगितले. तेव्हा आमचे सुचनेवरुन श्री संजय धनगर यांचे ताब्यातील नमुद ज्युपीटर दुचाकीची चावी पंच नं. 02 यांना घेण्यास सांगुन तिने गाडीची डिक्की उघडली असता,त्यामध्ये लाचेची रक्कम 2,50,000/-रु ताब्यात घेतली. सदर नोटाचे नंबर हे सापळा पुर्व पंचनाम्याचे वेळी कागदावर लिहुन, त्या कागदावर पंच व आम्ही स्वाक्षरी केलेली होती लाचेच्या नोटांचा व कागदवरील लाचेच्या नोटांचे नंबर एकच असल्याचे पंचाकरवी खात्री केली असता, स्विकारलेली रक्कम व कागदावरील नोटांचे नंबर तंतोतंत जुळुन आले. यशस्वी सापळा कारवाई दरम्यान ताब्यात घेतलेल्या इसमास आम्ही आमची व सापळा पथकाची ओळख देवुन त्यांना त्यांचे नांव, गांव विचारले असता, त्यांने त्यांचे नांव संजय भिकाजी धनगर, वय- 51 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद महसुल नायब तहसिलदार,

सिन्नर, नाशिक. रा. घर नं. 1182, मेनरोड, ठाकरेरोड, के.पी. मार्केट समोर, नाशिक असे सांगितल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. सदर ठिकाणी सार्वजनिक रस्ता असल्याने आम्ही, नायब तहसिलदार धनगर याना शासकीय वाहनाने ला.प्र.विभाग, नाशिक कार्यालय येथे पुढील कामकाजाचे दृष्टीने घेवून आलो. त्याबाबतचा यशस्वी सापळा कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला.

तरी दि. 06.12.2025 रोजी 19/42 ते 20/45 वाजेच्या दरम्यान संदिप हॉटेल समोर रुद्राय अमृतुल्य हॉटेल मध्ये मुंबईनाका नाशिक लोकसेवक संजय भिकाजी धनगर, वय- 51 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद महसुल नायब तहसिलदार सिन्नर,वर्ग 2, ता.सिन्नर जि.नाशिक रा. घर नं. 1182, मेनरोड, ठाकरेरोड, के.पी. मार्केट समोर, नाशिक यांनी तक्रारदार यांचा मुलगा व सुनेच्या नावे मौजे दोडी खुर्द ता.सिन्नर, जि. नाशिक येथील ग.नं. 499, क्षेत्र 3 हे 60 आर शेत जमिन खरेदी केली असून, सदर खरेदी खतावरुन तलाठी दोडी खुर्द यांनी घेतलेल्या फेरफार नोंद क्र. 3345 हि रद्द होण्याकरीता घेतलेल्या तक्रारीचा निकाल तक्रारदार यांच्या मुलाच्या व सुनेच्या बाजुने लावुन देवुन, त्यांचेकडे सुनावणीकामी असलेली फेरफार नोंद क्र. 3345 ही मंजुर करुन देण्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांच्याकडे 10 लाखाची मागणी करुन तडजोडीअंती 2,50,000/- रुपये कागदावर लिहुन पंचासमक्ष लाचेची मागणी केली. व मागणी केलेली लाच रक्कम दि. 09.12.2025 रोजी 21.30 वाजता सोपान हॉस्पीटल समोरील रोडलगत वेदांत हॉस्पीटल शेजारील पुर्व बाजुकडील मोकळ्या प्लॉटच्या भिंतीलगत नाशिक येथे स्वतःचा आर्थिक लाभ करुन घेण्यासाठी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाने करुन घेण्यासाठी 2,50,000/- रुपये.लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली म्हणुन माझी त्यांचेविरुध्द भ्रष्टचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

हि फिर्याद दिली. दि. 10.12.2025

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Atul bhujangrao kshirsagar

**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): PSI

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला) .

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

233

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F:-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन
नाशिक शहर

**Name (नाव):** Vishwas Rohidas Pa

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** PI